आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 14/07/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 155 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# अपघातग्रस्त वारकऱ्यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतली भेट

## मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत; जखमींवर मोफत उपचार करण्याचे निर्देश

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे, दि. 13 : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान आज सकाळी सासवड-जेजुरी मार्गावरील जेजुरी-बेलसर परिसरात झालेल्या अपघातात तीन वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर काही वारकरी जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली.**



यावेळी त्यांनी उपचाराधीन वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घेतली तसेच जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला दिल्या. अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून जखमी वारकऱ्यांवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी जेजुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष जयदीप दिलीप बारभाई, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, श्री. भावार्थ देखणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, जखमी वारकऱ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासन अपघातग्रस्त वारकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.

आषाढी वारीच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा घेऊन वारी मार्गावरील आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. पंढरपूरच्या दिशेने पायी निघालेल्या वारकऱ्यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून वाहनचालकांनी अत्यंत सावधगिरीने वाहन चालवून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

# पवना बंदिस्त जलवाहिनी योजनेबाबत आंदोलक शेतकऱ्यांची प्रशासनाबरोबर सकारात्मक बैठक

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी - मावळातील पवना धरण परिसरातून निगडीतील जलशुद्धीकरण केंद्राबाबतच्या पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत आंदोलनात सहभागी शेतकरी आणि प्रशासनाबरोबर सोमवारी समन्वय बैठक झाली. या बैठकीत आंदोलक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. प्रशासनाने संपूर्ण मागण्या समजावून घेऊन त्या मार्गी लावण्याची ग्वाही दिली. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून ही बैठक झाली.**



जलवाहिनी प्रकल्प बाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, माजी मंत्री बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी, पाठबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता प्रविण कोल्हे, मावळचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, पिंपरी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे आणि आंदोलक, धरणग्रस्त सर्व शेतकरी उपस्थित होते. सुरुवातीला खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील माहिती दिली. शेतकऱ्यांच्या मागण्यावर याबाबत सकारात्मक चर्चा झाली.पवना धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नाही. त्यामोबदल्यापोटीच्या जमिनीचे वाटप करावे. मावळसाठी किती पाणी आरक्षित ठेवले जाणार आहे, याचा खुलासा करावा. पाणी देण्यास आमचा विरोध नाही. मावळ तालुक्यातील गावांना शुद्ध पाणी द्यावे. आंदोलनात जखमी झालेल्यांना महापालिकेत नोकरी द्यावी. महापालिकेने धरण क्षेत्रातील विकास कामे करावीत. पवनाधरणग्रस्तांच्या कुटुंबातील सदस्यांना महापालिकेतील नोकरीसाठी पाच टक्के कोटा आरक्षित ठेवावा. पवना नदी मृत होणार नाही, पाणीसाठा जिवंत राहील, या पद्धतीने नदी स्वच्छ ठेवावी. परिसरातील गावांना स्वच्छ पाणी मिळावे, अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी बैठकीत केल्या. त्यावर जलवाहिनीच्या कामादरम्यान झालेल्या दुर्घटनेबाबत सुरुवातीलाच माफी मागून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले, गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. त्या सोडविल्या जातील. जिल्हा प्रशासन सकारात्मक आहे. सर्वांनी सकारात्मकपणे पुढे जावे. त्यात सर्वांचेच हित आहे. प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत करेल. प्रश्नांबाबत पूर्ण आश्वासन मिळाल्यानंतरच प्रकल्पाबाबत पुढील कारवाई केली जाईल.

पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी म्हणाले, पवना नदीलगतची कामे हाती घेतली आहे. नदीकाठी एसटीपी उभारले जाणार आहेत. त्याची निविदा लवकरच प्रसिद्ध केली जाईल.महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या जातील. पवना बंदिस्त जलवाहिनी योजना अतिशय आवश्यक आहे. नदी पात्रातील पाणी खराब झाले आहे. बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणल्यास शहरातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळेल.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 14/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भारताच्या प्रगतीसाठी संशोधनावर लक्ष-पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील

## पीसीयू मध्ये आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीट चे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी:भारताच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीसाठी नवोपक्रम व संशोधनावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आगामी काळात पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) हे स्टार्टअप केंद्रित विद्यापीठ म्हणून विकसित करण्यात येईल. तसेच हरित ऊर्जा, हवामान बदल, शाश्वत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात संशोधन करून आव्हानांचे संधी मध्ये रुपांतर करून स्टार्टअपला चालना दिली जाईल. तसेच भारत - जपान सहकार्य माध्यमातून विकसित भारत 2047 चे स्वप्न साकार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) येथे 'आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीट (आयएम 3)–2026' च्या उद्घाटन प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते. विकसित भारत 2047 या संकल्पनेला संशोधन आणि नव उपक्रम या माध्यमातून गती देण्यासाठी आयोजित परिषदेत कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, संशोधन व विकास संचालक तसेच डॉ. भरत काळे, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, मायक्रोलिन (अमेरिका) चे संस्थापक डॉ. अशोक जोशी आणि युनिव्हर्सिटी ऑफ न्यूकॅसल, ऑस्ट्रेलिया येथील ग्लोबल इनोव्हेटिव्ह सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड नॅनोमटेरियल्सचे संचालक प्रा. अजयन विनू , मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल, सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई, भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार, टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो, सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे, दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले, भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया आदींसह देश विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी झाले होते. यावेळी ॲबस्ट्रॅक्ट स्मरणिका प्रकाशित करण्यात आली.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सक्षम परिसंस्थेची माहिती देत विद्यार्थी आणि संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन करण्याचे आवाहन केले.प्रा. अजयन विनू यांनी कार्बन उत्सर्जन, हरित ऊर्जा, हायड्रोजन इंधन, स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत नॅनोमटेरियल्स या विषयांवर मार्गदर्शन केले.तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. अशोक जोशी यांनी ज्ञानाचे आर्थिक मूल्यात रुपांतर करणारी प्रक्रिया म्हणजे नवोपक्रम असून, तो देशाच्या अर्थव्यवस्था वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई यांनी ऊर्जा साठवणूक, द्विमितीय पदार्थ, इलेक्ट्रोकॅटलिसिस, लिथियम-आयन बॅटरी, बॅटरी कचरा आणि स्वच्छ ऊर्जेतील आव्हाने यावर मार्गदर्शन केले.

प्रा. अजयन विनू यांनी प्रगत सच्छिद्र कार्बन आधारित पदार्थ, हायड्रोजन निर्मिती, कार्बन डायऑक्साइड नियंत्रण आणि पर्यावरणपूरक ऊर्जा उपाय यावरील संशोधन सादर केले.

भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने क्वांटम पदार्थांचे अभियांत्रिकीतील संशोधन, मशीन लर्निंगचा वापर आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी आवश्यक प्रगत पदार्थ विकास याविषयी माहिती दिली.टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड, इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो यांनी जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधनातील नवे प्रवाह आणि 2035 पर्यंतच्या तांत्रिक परिवर्तनाची माहिती दिली.मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल यांनी आरोग्य सेवेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गुंतवणुकीचे आर्थिक मूल्यांकन, त्यातील आव्हाने आणि संधी स्पष्ट केल्या.सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य यांनी भाषा मॉडेल्स मधील डेटा करप्शन आणि त्यावरील उपाय याची माहिती दिली.महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे यांनी अचूक शेती, पीक निरीक्षण, हवामान बदलाशी सुसंगत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्मार्ट कृषी तंत्रज्ञान वापर याचे मार्गदर्शन केले.

दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले यांनी ब्लॉकचेन आधारित हरित ऊर्जा प्रणाली, ऊर्जा देवाण घेवाण, मशीन लर्निंग आधारित ऊर्जा अंदाज प्रणाली यावर सादरीकरण केले.भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया यांनी सौरऊर्जा निर्मितीसाठी प्रगत सेमिकंडक्टर पदार्थ, फोटोव्होल्टाइक तंत्रज्ञान आणि पुढील पिढीतील सौरऊर्जा संशोधनातील संधी याची माहिती दिली. ही आंतरराष्ट्रीय परिषद पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.प्रास्ताविक डॉ. भरत काळे यांनी केले.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते जेजुरी येथे वारकऱ्यांना हायजिनिक किटचे वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांच्या वतीने जेजुरी येथे पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांना हायजिनिक किटचे वाटप करण्यात आले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या सेवा उपक्रमाचा शुभारंभ झाला.**

वारकऱ्यांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेचा विचार करून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे सचिव दत्तूजी समरीतकर तसेच संस्थानाचे विश्वस्त व मुख्य पुजारी केशवरावजी फुलझेले उपस्थित होते.

वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाची परंपरा जपत वारकऱ्यांच्या आरोग्य आणि स्वच्छतेला प्राधान्य देणारा हा उपक्रम भाविकांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला. भविष्यातही समाजोपयोगी सेवा उपक्रम सातत्याने राबविण्याचा संस्थानाचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 14/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना जास्तीत जास्त मदत द्या!

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**मोशी येथील कचरा डेपो परिसरात अतिवृष्टीमुळे लँडफिलचा काही भाग खचून वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई, कायमस्वरूपी रोजगार, घर, मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी, अशी मागणी भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसेवक राहुल कलाटे, धर्मपाल तंतरपाळे, आरपीआयचे गटनेते कुणाल वाव्हळकर, योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, प्रा. उत्तम केंदळे, सचिन तापकीर, सागर गवळी, नवनाथ जगताप, शितल शिंदे, बापू घोलप, सागर आंघोळकर आणि सचिन सानप उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मोशी येथील दुर्घटना ही केवळ औद्योगिक अपघात नसून अनेक कुटुंबांवर कोसळलेले मोठे सामाजिक संकट आहे. या दुर्घटनेत 9 कुटुंबांचा कर्ता व्यक्ती गमावला असून त्यांच्या कुटुंबांचे उत्पन्नाचे साधन एका क्षणात संपुष्टात आले आहे. त्यामुळे केवळ शोक व्यक्त करणे किंवा मर्यादित आर्थिक मदत जाहीर करणे पुरेसे ठरणार नाही. तर, महानगरपालिका, राज्य शासन आणि संबंधित वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची ठेकेदार कंपनी, विमा कंपनी तसेच, शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला संयुक्तपणे जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी. तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसाला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नोकरी देण्यासाठी सर्वसाधारण सभेत विशेष प्रस्ताव तयार करून तो शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

याशिवाय संबंधित ठेकेदार कंपनीने मृत कर्मचाऱ्यांच्या आणखी एका पात्र कुटुंबीयाला कायमस्वरूपी नोकरी द्यावी. मृतांच्या मुलांच्या बालशिक्षणापासून उच्च शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचा संपूर्ण खर्च कंपनीने उचलावा. कुटुंबातील विधवा महिला अथवा अन्य आश्रितांना स्वयंरोजगारासाठी विशेष आर्थिक सहाय्य, व्याजमुक्त कर्ज किंवा कौशल्य प्रशिक्षण देण्यात यावे.तसेच प्रधानमंत्री आवास योजना, राज्य शासनाच्या गृहनिर्माण योजना, एसआरए अथवा महानगरपालिकेच्या उपलब्ध योजनांमधून प्रत्येक पीडित कुटुंबाला कायमस्वरूपी घर उपलब्ध करून देण्यात यावे. जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च महानगरपालिका आणि संबंधित कंपनीने संयुक्तपणे उचलावा. त्यांना विमा लाभ, पुनर्वसन, आर्थिक सहाय्य आणि आवश्यक असल्यास कृत्रिम अवयव, पुनर्वसन उपचार तसेच मानसोपचार सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

डोळस यांनी दुर्घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि संस्थांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सर्व कचरा डेपो, वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प आणि लँडफिल क्षेत्रांचे स्वतंत्र तांत्रिक सुरक्षा ऑडिट करण्यात यावे, तसेच दुर्घटनाग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र समन्वय अधिकारी नियुक्त करून मदतीची संपूर्ण प्रक्रिया वेळबद्ध पद्धतीने पूर्ण करावी, अशीही मागणी केली आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या :**

1. प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला महानगरपालिका, ठेकेदार कंपनी, विमा संरक्षण आणि शासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त संयुक्त आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी.

2. मृत कर्मचाऱ्यांच्या एका पात्र वारसाला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नोकरी देण्यासाठी विशेष प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठवावा. संबंधित ठेकेदार कंपनीने आणखी एका पात्र कुटुंबीयाला कायमस्वरूपी रोजगार द्यावा.

3. मृतांच्या मुलांच्या शैक्षणिक साहित्याचा संपूर्ण खर्च कंपनी व शासनाने उचलावा. प्रत्येक पीडित कुटुंबाला प्रधानमंत्री आवास योजना, एसआरए किंवा इतर गृहनिर्माण योजनांतून कायमस्वरूपी घर उपलब्ध करून द्यावे.

4. दुर्घटनेची न्यायालयीन अथवा उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी लँडफिल आणि वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पांचे नियमित सुरक्षा ऑडिट, आपत्कालीन यंत्रणा आणि मानक कार्यपद्धती (SOP) बंधनकारक करावी.

5. जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च, विमा लाभ आणि आवश्यक आर्थिक सहाय्य तातडीने उपलब्ध करून द्यावे.

मोशी दुर्घटनेत अनेक कुटुंबांचा कर्ता व्यक्ती हिरावला गेला आहे. या कुटुंबांचे दुःख कोणतीही आर्थिक मदत भरून काढू शकत नाही. मात्र, त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी महापालिका, संबंधित कंपनी आणि शासनाने संयुक्तपणे जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई, कायमस्वरूपी रोजगार, घर, मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी. ही केवळ मदतीची बाब नसून प्रशासनाची नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत."

**विकास डोळस**, माजी नगरसेवक, भाजपा.

# पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन – विनोद वरखडे

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख रस्त्यांवर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक, प्रवासी आणि पादचारी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुढील आठवडाभरात रस्त्यांची दुरुस्ती करून खड्डे कायमस्वरूपी बुजवावेत, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने राष्ट्रवादी स्टाईल आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वाहतूक सेल अध्यक्ष श्री. विनोद वरखडे यांनी दिला आहे.**



यासंदर्भात महापौर, महापालिका आयुक्त आणि विरोधी पक्षनेते यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षी पावसाळ्यात खड्डे तात्पुरत्या स्वरूपात बुजवले जातात. मात्र पावसामुळे भराव वाहून जात असल्याने काही दिवसांतच खड्डे पुन्हा निर्माण होतात. त्यामुळे कायमस्वरूपी आणि दर्जेदार दुरुस्तीची आवश्यकता आहे.शहरातील देहू-आळंदी रस्ता, चिंचवड स्टेशन परिसर, तळवडे, मोशी-चऱ्होली रस्ता, बोऱ्हाडेवाडी तसेच चिंचवड स्टेशन ते चिखली या मार्गांवरील रस्त्यांची पावसामुळे मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. निगडी ते चिंचवडदरम्यान मेट्रोचे काम सुरू असल्याने रस्ते आधीच अरुंद झाले असून, त्यात खड्ड्यांमुळे वाहतूक संथ होत आहे. परिणामी एसटी, पीएमपीएमएल व इतर सार्वजनिक वाहतूक सेवांवर परिणाम होत असून प्रवाशांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून पादचारी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना देखील मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे महापालिका प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.पुढील आठवडाभरात रस्ते दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा श्री. विनोद वरखडे यांनी दिला.

यावेळी पदवीधर सेल अध्यक्ष प्रदीप औटी, सामाजिक कार्यकर्ते भरतशेठ वाळके, अनुराग कुरणे पाटील, अकबर शेख, स्वप्निल चौव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 14/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# खासदार श्रीरंग बारणे यांनी आज सोमवारी, (दि. 13 जुलै) आयुक्त सूर्यवंशी यांना दिलेले पत्र

## मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी दोषींवर तात्काळ कारवाई करून उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मोशी येथील कचरा डेपोमध्ये घडलेल्या अत्यंत दुर्दैवी दुर्घटनेत निरपराध 9 कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. एवढी गंभीर दुर्घटना घडूनही आजपर्यंत संबंधित ठेकेदार, जबाबदार अधिकारी किंवा इतर दोषींवर ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून निष्काळजीपणाची दखल घेणे आवश्यक आहे.**



घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणारे संबंधित विभागाचे अधिकारी, तसेच कचरा प्रक्रिया करणारे ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा गंभीर संशय निर्माण होतो. शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची वेळेत व नियमानुसार विल्हेवाट लावण्यात मोठ्या प्रमाणात त्रुटी राहिल्यामुळे कचऱ्याचा प्रचंड डोंगर निर्माण झाला.सदर वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प सुमारे एक ते दीड महिना बंद असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच दिनांक 30 जून 2016 रोजी प्रकल्पाच्या परवानगीची मुदत संपल्यानंतरही तो कोणत्या कायदेशीर परवानगीच्या आधारे सुरू ठेवण्यात आला, याची चौकशी होणे आवश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 मधील तरतुदी आणि अनुसूचीतील सुरक्षा व व्यवस्थापन नियमांचे पालन झाले का, याचीही सखोल तपासणी करावी.

मागील महिन्यात वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची चिमणी कोसळूनही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. तरीही कामगारांना त्या परिसरात काम करण्यास लावण्यात आले. प्रकल्प बंद असतानाही कामगारांना कशासाठी बोलविले होते? तसेच दुर्घटनाग्रस्त इमारतीचे दोन मजले अनधिकृत असल्याची माहिती समोर येत आहे. कचऱ्याच्या प्रचंड ढिगाऱ्यालगत अशी इमारत कोणत्या नियमांनुसार उभारण्यात आली, त्यास परवानगी कोणी दिली आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे, यांची चौकशी होणे अत्यावश्यक आहे. व दोषीवर त्वरित कारवाई झाली पाहिजेयाशिवाय पर्यावरण विभागाची जबाबदारी अनेक वर्षे एकाच अधिकाऱ्याकडे का ठेवण्यात आली, स्वतंत्र वरिष्ठ पर्यावरण पदाची निर्मिती व कार्यपद्धती कशी ठरविण्यात आली, वेस्ट-टू-एनर्जी, बायोमायनिंग व इतर घनकचरा प्रकल्पांबाबत अंतिम निर्णय कोणत्या अधिकारी किंवा समितीकडून घेतले जात होते, याची माहिती सार्वजनिक करण्यात यावी.

2025 मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या नोटिशीनंतरही आवश्यक सुरक्षा उपाययोजना का राबविण्यात आल्या नाहीत, याबाबत संबंधित अधिकारी व ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच दुर्घटनेचे सीसीटीव्ही फुटेज अद्याप सार्वजनिक करण्यात आलेले नाही. ते तात्काळ जाहीर करून संपूर्ण घटनेचे सत्य नागरिकांसमोर आणावे.या दुर्घटनेमुळे झालेल्या जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि निष्काळजीपणासाठी जबाबदार असलेल्या सर्व अधिकारी, ठेकेदार व संबंधित व्यक्तींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष व कालबद्ध चौकशी करून त्याचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कामगारांना न्याय मिळावा, भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत आणि दोषींना कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आपण तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

# श्री गणेश सहकारी बँकेच्या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कारजवाहर ढोरे व अशोक कवडे बिनविरोध निवडून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : नवी सांगवी येथील श्री गणेश सहकारी बँक निवडणुकीत श्री. जवाहर ढोरे आणि श्री. अशोक कवडे यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दोन्ही नवनिर्वाचित संचालकांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.**

सत्कार समारंभात बोलताना बँकेच्या अध्यक्षांनी सांगितले की, श्री गणेश सहकारी बँकेने नेहमीच सर्वसामान्य सभासदांच्या हिताला प्राधान्य देत विश्वास, पारदर्शकता आणि लोकाभिमुख कामकाजाची परंपरा जपली आहे. सहकार क्षेत्र अधिक सक्षम व्हावे आणि सामान्य नागरिकांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या सहकार धोरणांचा मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी मांडलेली सहकाराची व्यापक संकल्पना देशभर प्रभावीपणे राबविली जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र अधिक मजबूत होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.श्री गणेश सहकारी बँक सभासदांच्या विश्वासाला पात्र ठरत भविष्यात प्रगतीची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968